पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ११
**सभावृत्तांत**

दिनांक :- २६ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २६ / ०९ / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती

२) मा. मोटे किरण बाळासाहेब

३) मा. जवळकर वैशाली राहुल

४) मा. सौ. साळुंके सविता सुरेश

५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

६) मा. आल्हाट मंदा उत्तम

७) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

८) मा. काळे विमल रमेश

याशिवाय मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१ :- विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप व सन २०१०-११ मधील शिवणयंत्र वाटपाबाबत - मा.किरण मोटे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२ :- योगा व कराटेचे प्रशिक्षण देणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.किरण मोटे अनुमोदक :- मा.आशा सुर्यवंशी

मा.अजितदादा पवार यांनी त्यांचेवर करणेत आलेल्या खोटया आरोपांची निःपक्षपातीपणे चौकशी करणेत येण्यासाठी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिलेला आहे. त्यास महिला व बालकल्याण समितीच्यावतीने पाठींबा देण्यात येत आहे.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**दिनांक १२/०९/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १० ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.**

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - १
दिनांक - २६/०९/२०१२
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा. आशा सुर्यवंशी
संदर्भ - मा.किरण मोटे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबवण्यिात येणा-या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत मनपा हद्दीतील इ.८ वी ते १२ वी मध्ये शिकत असणा-या विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप करण्यात येते. तरी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील या योजनेची अर्जवाटप प्रक्रिया त्वरित सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील वाटप करावयाच्या ज्या शिवणमशिन खरेदी करणेत आलेल्या आहेत त्या वगळून उर्वरित शिवण मशिन खरेदीसाठीची निविदा प्रक्रिया त्वरित सुरु करणेस व मशिनची खरेदी त्वरित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - २
दिनांक - २६/०९/२०१२
सूचक - मा. आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ - मा.आशा सुर्यवंशी, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत मनपा हद्दीतील मुली / महिलांसाठी योगा व कराटेचे प्रशिक्षण सुरु करण्यास तसेच या प्रशिक्षणासाठी योग विद्या धाम पिंपरी चिंचवड, जिव्हाळा महिला विकास प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड,

लोकमान्य हास्ययोग संघ पुणे, हा नाइज तायक्वोंदो ॲकॅडमी चिंचवड या संस्थांची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ १२२४ /२०१२
दिनांक :- २८ / ०९ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.